# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## डिजिटायझेशनमध्ये महा मेट्रो आघाडीवर
## एका दिवसात ४२ हजार प्रवाशांनी महा कार्डचा वापर केला
## फ्री कार्ड ऑफरअंतर्गत १३०० महा कार्ड्स वितरित



नागपूर: प्रवाशांच्या सोयीसाठी डिजिटायझेशनचा अवलंब करण्यात महा मेट्रोने नेहमीच आघाडी घेतली असून महा कार्ड ही डिजिटल तिकिटिंगची एक लोकप्रिय सुविधा असून, त्याचा वापर दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. एका दिवसात तब्बल ४२,२५७ प्रवाशांनी महा कार्डद्वारे प्रवास केल्याची नोंद झाली आहे. काल ५ ऑगस्ट २०२५ रोजी नागपूर मेट्रोने एकूण १.०७ लाख प्रवाश्यानी मेट्रोने प्रवास केल्या ज्यामध्ये महा कार्डचा वापर करून ४२२५७ प्रवाशांचा प्रवास केला हा आतापर्यंतचा सर्वाधिक असून, एकूण प्रवाश्यापैकी ३९% प्रवासी महा कार्ड वापरकर्ते होते. त्याचबरोबर, एकूण प्रवाश्यापैकी ५६% प्रवास रोखरहित (cashless) पद्धतीने झाला असून ही देखील एक मोठी उपलब्धी आहे जे कि, डिजिटल व्यवहारांच्या यशस्वी स्वीकाराचे प्रतीक आहे.

याशिवाय, २५ जुलै २०२५ रोजी महा मेट्रोने रु. २०० रिचार्जवर मोफत महा कार्ड देण्याची ऑफर सुरू केली होती. या उपक्रमाला प्रवाशांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला असून, आत्तापर्यंत सुमारे १३०० नवीन महा कार्ड्स वितरित करण्यात आले आहेत. महा कार्डचा वापर वाढवण्यासाठी महा मेट्रो टीमने केलेल्या प्रयत्नांना यश मिळत आहे.

वर नमूद केल्या प्रमाणे ५ ऑगस्ट रोजी ५६% प्रवास हा कॅशलेस पद्धतीने झाला. याचाच अर्थ नागरिकांनी डिजिटल पेमेंट पर्याय मोठ्या प्रमाणात स्वीकारले असून, कॅशलेस प्रवास ही हळूहळू नवीन जीवनशैली बनत आहे.

